**कोषागारातून रोख देय अनुदान**

केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन ( ग्रा.) अंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी केंद्र हिश्श्याचे सर्वसाधारण घटकासाठी अनुदान वितरीत करण्याबाबत.
**(लेखाशीर्ष २२१५ ९८३५)**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
शासन निर्णय क्रमांकः निर्मल-२०१७/प्र.क्र.७९/पापु-१६
७ वा मजला, जी.टी. रूग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०० ००१.
दिनांक:३ नोव्हेंबर, २०१७

वाचा

१. **केंद्र शासनाचे मंजूरी आदेश क्र.:** एस-१२०११/७/२०१५-एसबीएम,दि.१३ ऑक्टोबर, २०१७.
२. **केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) संदर्भातील मार्गदर्शक सूचना:** दि.१८ डिसेंबर, २०१४.
३. **शासन परिपत्रक क्रमांकः** स्वभामि-२०१४/प्र.क्र.२७/पापु-०८, दि.७ नोव्हेंबर, २०१४.
४. **पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे पत्र क्रमांक:** स्वभामि-२०१५/प्र.क्र.१९४/पापु-०८, दि.११ जानेवारी, २०१६.
५. **वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांकः** अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८ एप्रिल, २०१७.
६. **पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,शासन निर्णय क्रमांक:** निर्मल-२०१७/प्र.क्र.७९/पापु-१६, दि.२२ जून, २०१७.

**प्रस्तावना**

केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) अंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता सर्वसाधारण घटकासाठी २२१५ ९८३५ या लेखाशीर्षाखाली केंद्र हिश्याचा रु.१६९८४२.०४ लक्ष इतका नियतव्यय मंजुर करण्यात आला असून तो पुर्णपणे अर्थसंकल्पीत करण्यात आलेला आहे. सदर रु.१६९८४२.०४ लक्ष निधी वित्त विभागाने अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध करून दिलेला आहे. उक्त वाचा मधील क्र.६ येथील शासन निर्णयान्वये केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) अंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता सर्वसाधारण घटकासाठी केंद्र हिश्याच्या पहिल्या हप्त्यापोटी प्राप्त रू.३५१२३.९९ लक्ष इतका निधी संबधीत अंमलबजावणी यंत्रणांना यापुर्वीच वितरित करण्यात आलेला आहे. उक्त वाचा मधील क्र.१ येथील केंद्र शासनाच्या मंजूरी आदेशान्वये रू.२१९२३.८१ लक्ष (दोनशे एकोणीस कोटी तेवीस लक्ष एक्याऐंशी हजार फक्त) इतका निधी स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) अंतर्गत सर्वसाधारण घटकासाठी केंद्र

हिश्श्याच्या दुसऱ्या हप्त्यापोटी राज्यास प्राप्त झालेला आहे.सदर रू.२१९२३.८१ लक्ष निधी वितरीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता, याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**शासन निर्णय**

केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) योजनेंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता सर्वसाधारण घटकासाठी (Normal allocation) केंद्र हिश्श्याच्या दुसऱ्या हप्त्यापोटी रु.२१९२३.८१ लक्ष (दोनशे एकोणीस कोटी तेवीस लक्ष एक्याऐंशी हजार फक्त) इतका निधी वितरणासाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या ऑक्टोबर,२०१७ मधील सुधारीत मार्गदर्शक सूचनेनुसार माहिती, शिक्षण व संवाद (IEC) आणि क्षमता बांधणी इत्यादीसाठी केंद्र हिश्श्याचा ५ % निधी राज्यात खर्च करणे आवश्यक आहे. उपलब्ध रु.२१९२३.८१ लक्ष निधीपैकी राज्यातील माहीती,संवाद व शिक्षण आणि क्षमता बांधणी इत्यादीसाठी रू.१०९६.१९ लक्ष व राज्यस्तरावरील प्रशासकीय खर्चासाठी रु.४३.८५ लक्ष असा एकुण रू.११४०.०४ लक्ष इतका निधी संचालक,पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांचे अधिनस्त ठेवण्यात येत आहे. जिल्हा परिषदांना वितरीत करावयाचे रू.२०७८३.७७ लक्ष (दोनशे सात कोटी,त्र्याऐंशी लक्ष,सत्त्याहत्तर हजार फक्त) इतके अनुदान संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील स्तंभ क्र. ४ नुसार अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे रोख स्वरूपात मुक्त करण्यात येत आहे.जिल्हा परिषदांना वितरित करण्यात येत असलेल्या सदर निधीतून जिल्हा परिषदांनी माहिती, शिक्षण व संवाद (IEC) आणि क्षमता बांधणी इत्यादीसाठी खर्च करण्यात येऊ नये. जिल्ह्यांचा माहिती, शिक्षण व संवाद (IEC) आणि क्षमता बांधणी इत्यादीसाठीचा वार्षिक कृती आराखडा पाहून गरजेनूसार जिल्हा परिषदांना राज्यस्तरावरुन स्वतंत्रपणे निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.याबाबतचे आदेश यथावकाश निर्गमित करण्यात येतील. वितरित करण्यात येत असलेला सदर निधी जिल्हा परिषदांनी सदर आदेश निर्गमित झाल्यापासून एक महिण्यात खर्च करावा अन्यथा आपणास आवश्यकता नाही असे समजून सदर निधी इतर जिल्ह्यात वळविण्यात येईल. सदर अनुदान हे सशर्त मंजूर करण्यात येत आहे.

२. "राज्यस्तरावर संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांचेकडे ठेवण्यात आलेली रू. ११४०.०४ लक्ष एवढी रक्कम आहरण व संवितरण अधिकारी तथा वित्त नियंत्रक, रिफॉर्म सपोर्ट व प्रोजेक्ट मॅनेजमेंट युनिट (जलस्वराज्य प्रकल्प टप्पा-२), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे BEAMS प्रणालीवर वितरीत करण्यात येत आहे. सदर रक्कम रू ११४०.०४ लक्ष (रूपये अकरा कोटी, चाळीस लक्ष, चार हजार फक्त) अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई यांच्या कार्यालयातून आहरीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी तथा वित्त नियंत्रक, रिफॉर्म सपोर्ट व प्रोजेक्ट मॅनेजमेंट युनिट (जलस्वराज्य प्रकल्प टप्पा-२) (श्री. एन.व्ही. कोंगले), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय, मुंबई यांना व नियंत्रक अधिकारी म्हणून उप सचिव तथा प्रकल्प संचालक, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (श्री. रूचेश

जयवंशी), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. आहरण व संवितरण अधिकारी तथा वित्त नियंत्रक, रिफॉर्म सपोर्ट व प्रोजेक्ट मॅनेजमेंट युनिट (जलस्वराज्य प्रकल्प टप्पा-२) (श्री. एन.व्ही. कोंगले), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी रू. ११४०.०४ लक्ष इतकी रक्कम अधिदान व लेखाधिकारी, मुंबई यांच्या कार्यालयातून आहरीत करून स्वतंत्र धनादेशान्वये संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, नवी मुंबई यांच्याकडे सुपूर्द करावी".

३. या शासन निर्णयाद्वारे मुक्त केलेली रक्कम पुढील अटींवर मंजूर करण्यात येत आहे.

अ) या शासन निर्णयाद्वारे मंजूर केलेले अनुदान ज्या करणासाठी मंजूर करण्यात आले आहे त्याच करणासाठी खर्च करण्यात यावे. संबंधित जिल्हा परिषदा/संस्था यांनी या शासन निर्णयाद्वारे मुक्त केलेला निधी, या कार्यक्रमासाठी उघडलेल्या स्वतंत्र बँक खात्यात जमा करावा.

आ) संबंधित जिल्हा परिषदेने/संस्थेने या शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात आलेल्या अनुदानापेक्षा जास्त खर्च करू नये.

इ) अट क्र.३-अ आणि ३-आ यांची पुर्तता झाली आहे याची खात्री करण्यासाठी, महालेखापाल-१, मुंबई व महालेखापाल-२, नागपूर यांच्याकडे जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी लेखे तपासणीसाठी सर्व कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत.

ई) सदर रक्कम केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांमधील तरतूदींनुसार तसेच या संदर्भात राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनेप्रमाणे/ आदेशाप्रमाणे खर्च करण्यात यावी.

उ) ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाचा विहित नमून्यातील मासिक प्रगती अहवाल प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत शासनास पाठविण्याची दक्षता घ्यावी. शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनेप्रमाणे जिल्हा परिषदांनी या अनुदानाच्या खर्चाचा महालेखापाल कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालावा व ताळमेळाचे अहवाल विहित कालावधीत या विभागातील पापु-०४, पापु-१६ व पापु-२० या कार्यासनांस सादर करावा.

ऊ) पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांनी निधी वितरण, खर्च याबाबतची नोंद केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर (IMIS) घेण्याची दक्षता घ्यावी.

ऋ) सदर रक्कम खर्च करताना वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८ एप्रिल, २०१७ मधील अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करून आवश्यक बाबींची पुर्तता करून कार्यपूर्ती अहवाल/नमूद प्रमाणपत्रे शासनास त्वरीत सादर करावीत.

ऌ) सदर रक्कम खर्च झाल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास त्वरित सादर करावे.

४. हा खर्च "मागणी क्रमांक वाय-०२, २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता, ०२ जलनि:स्सारण व स्वच्छता, १०७ मलप्रणाल सेवा, (०२) ग्रामसफाई कार्यक्रम, (०२) (१०) निर्मल भारत अभियान केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत

शौचालय बांधणे (सर्वसाधारण घटक) (केंद्र हिस्सा) (२२१५ ९८३५), ३१ सहायक अनुदाने(वेतनेतर) " या लेखाशीर्षाखाली घालावा.सदर अनुदान सशर्त मंजूर करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८ एप्रिल, २०१७ अन्वये या विभागास प्रदान केलेल्या अधिकारात तसेच सदर परिपत्रकातील अटी व शर्तींच्या अधीन राहून मुक्त करण्यात येत आहे. सदर परिपत्रकातील परिच्छेद ७ ते १८ मधील तसेच परिशिष्टातील अ.क्र.८ मधील तपासणीसुचीतील अ.क्र.१ ते १० मधील लागू असलेल्या अटी व शर्तींची पुर्तता होत असल्याचे प्रमाणीत करण्यात येत आहे.उपरोक्त रू.२१९२३.८१ लक्ष एवढा केंद्र निधी राज्याच्या एकत्रीत निधीत जमा झाल्याबाबतची खात्री वित्त विभागाच्या अर्थोपाय शाखेकडुन करण्यात आली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११०३१४४९४२२८२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Smita Sachin Rane

Digitally signed by Smita Sachin Rane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f85d92aa99ea42eb86747707e3c3a129af986c1f95f6bc3e8165ceaf5155e6e7, serialNumber=4b9befd340493837db4cffafa6b96eeaf6aa3c12a7a6bf0467b0f517b724e8ee, cn=Smita Sachin Rane
Date: 2017.11.03 15:09:59 +05'30'

**(स्मिता स.राणे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
२. मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
३. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
४. महालेखापाल, महाराष्ट्र- १/२ मुंबई/नागपूर (लेखा परीक्षा व अनुज्ञेयता)
५. विभागीय आयुक्त, सर्व.
६. उपायुक्त विकास, सर्व विभागीय आयुक्त यांचे कार्यालय.
७. उप सचिव तथा प्रकल्प संचालक, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष , पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
८. जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती सर्व.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
१०. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.

११. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/नागपूर.
१२. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, (WSSO), बेलापूर, नवी मुंबई.
१३. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा.व स्व.), जिल्हा परिषद, सर्व.
१४. उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, जिल्हा परिषद, सर्व.
१५. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
१६. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
१७. नियोजन विभाग, (का.क्र.१४४३) मंत्रालय, मुंबई.
१८. वित्त विभाग, (व्यय-३) मंत्रालय, मुंबई.
१९. आहरण व संवितरण अधिकारी तथा वित्त नियंत्रक, रिफॉर्म सपोर्ट व प्रोजेक्ट मॅनेजमेंट युनिट (जलस्वराज्य प्रकल्प टप्पा-२)
२०. कार्यासन क्र.पापु-०४, पापु-२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१. निवड नस्ती, कार्यासन पापु-१६.

# विवरणपत्र

**केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) अंतर्गत सन २०१७-१८ करिता केंद्र हिश्श्याच्या सर्वसाधारण घटकासाठी अनुदानाचे वितरण(लेखाशिर्ष २२१५ ९८३५).**

शासन निर्णय क्र.निर्मल-२०१७/प्र.क्र.७९/पापु-१६, दि.३ नोव्हेंबर,२०१७ सोबतचे सहपत्र.

(रू.लाखांत)

| अ.क्र. | जिल्हा परिषद/ वासो | दि.२२ जून,२०१७ च्या शासन निर्णयान्वये मुक्त करण्यात येत असलेला निधी | या शासन निर्णयान्वये मुक्त करण्यात येत असलेला निधी | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | वासो | २०८७.२१ | ११४०.०४ | ३२२७.२५ |
| २ | ठाणे | १५८.८५ | ०.०० | १५८.८५ |
| ३ | रायगड | १८०४.६३ | ५२१.३० | २३२५.९३ |
| ४ | रत्नागिरी | ५६६.१३ | ०.०० | ५६६.१३ |
| ५ | सिंधुदूर्ग | ५००.०० | ०.०० | ५००.०० |
| ६ | पालघर | ६५७.५० | ०.०० | ६५७.५० |
| ७ | नाशिक | २२३९.४४ | १०१४.४९ | ३२५३.९३ |
| ८ | धुळे | ७८१.२५ | १०८९.४५ | १८७०.७० |
| ९ | नंदूरबार | २८५.४७ | ०.०० | २८५.४७ |
| १० | जळगाव | ६८६.६१ | ८०२.५४ | १४८९.१५ |
| ११ | अहमदनगर | १५३२.६२ | ८३७.३० | २३६९.९२ |
| १२ | पुणे | १५१६.२३ | ९७५.४९ | २४९१.७२ |
| १३ | सातारा | २५०.०१ | २८४.४० | ५३४.४१ |
| १४ | सांगली | ५१२.६८ | ०.०० | ५१२.६८ |
| १५ | सोलापूर | २२४३.४२ | १०९८.५० | ३३४१.९२ |
| १६ | कोल्हापूर | ५२४.२२ | ०.०० | ५२४.२२ |
| १७ | औरंगाबाद | १९०६.११ | १७०८.७८ | ३६१४.८९ |
| १८ | जालना | १९७५.६७ | १०१३.६५ | २९८९.३२ |
| १९ | परभणी | १७४१.०१ | ५५०.१२ | २२९१.१३ |
| २० | हिंगोली | ५७६.३६ | ९८२.२१ | १५५८.५७ |
| २१ | बीड | १९३४.१६ | १९८५.९० | ३९२०.०६ |

| अ.क्र. | जिल्हा परिषद/ वासो | दि.२२ जून,२०१७ च्या शासन निर्णयान्वये मुक्त करण्यात येत असलेला निधी | या शासन निर्णयान्वये मुक्त करण्यात येत असलेला निधी | एकुण |
|---|---|---|---|---|
| २२ | नांदेड | १२१२.९२ | १८८२.११ | ३०९५.०३ |
| २३ | उस्मानाबाद | २००.०० | १४७०.६९ | १६७०.६९ |
| २४ | लातूर | १४२२.८० | ९६९.०५ | २३९१.८५ |
| २५ | अमरावती | ८९६.९६ | ६४२.२९ | १५३९.२५ |
| २६ | अकोला | १०५१.२१ | ५७६.९० | १६२८.११ |
| २७ | वाशिम | ६२६.३९ | २८५.०४ | ९११.४३ |
| २८ | बुलढाणा | ६०३.११ | ५७७.२३ | ११८०.३४ |
| २९ | यवतमाळ | ११६८.७९ | ९८४.५० | २१५३.२९ |
| ३० | नागपूर | ५०७.०९ | ०.०० | ५०७.०९ |
| ३१ | वर्धा | ३५७.५० | ०.०० | ३५७.५० |
| ३२ | भंडारा | ६६०.८२ | २३७.०० | ८९७.८२ |
| ३३ | गोंदिया | ०.०० | ८३.४१ | ८३.४१ |
| ३४ | चंद्रपूर | १११४.७८ | ०.०० | १११४.७८ |
| ३५ | गडचिरोली | ८२२.०४ | २११.४२ | १०३३.४६ |
| एकूण | | ३५१२३.९९ | २१९२३.८१ | ५७०४७.८० |
| अक्षरी रूपये | | तीनशे एकावन्न कोटी तेवीस लक्ष नव्याण्णव हजार फक्त | दोनशे एकोणीस कोटी तेवीस लक्ष एक्याऐंशी हजार फक्त | पाचशे सत्तर कोटी सत्तेचाळीस लक्ष ऐंशी हजार फक्त |

Smita Sachin Rane

Digitally signed by Smita Sachin Rane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f85d92aa99ea42eb86747707e3c3a129af986c1f95f6bc3e8165ceaf5155e6e7, serialNumber=4b9befd340493837db4cffafa6b96eeaf6aa3c12a7a6bf0467b0f517b724e8ee, cn=Smita Sachin Rane
Date: 2017.11.03 15:10:47 +05'30'

**(स्मिता स.राणे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**